तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : dtedesk2a@gmail.com Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

स्मरणपत्र - १

क्रमांकः २अ/एडीएम/प्रवेश/२०१६/ १३४८
दिनांक : 7 OCT 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेशाबाबत..

संदर्भ : क्रमांकः २अ/एडीएम/प्रवेश/२०१६/११७१, दिनांक २६/८/२०१६

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता या संचालनालयाच्या नियंत्रणाखालील ज्या भाषिक अल्पसंख्यांक संस्थेतील व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात आलेला आहे. अशा सर्व संस्थेतील भाषिक अल्पसंख्यांक कोटयाअंर्तगत प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रमाणपत्राची पडताळणी करुन ज्यांची मातृभाषा शाळासोडल्याच्या दाखल्यावर (School Leaving Certificate) वेगळी नमूद असून त्यांनी शपथपत्र मात्र मातृभाषा वेगळी असल्याचे सादर केलेले आहे. अशा प्रकारची माहिती संस्थानिहाय एकत्रितरित्या खालील नमूद विवरणपत्रात या संचालनालयात त्वरित सादर करण्यात यावी. आपल्या कार्यालयाकडून प्राप्त माहितीच्या आधारे अल्पसंख्यांक विभागास या संचालनालयामार्फत अहवाल सादर करण्यात येईल व त्यांच्या निर्देशानुसार हया प्रकरणी पुढील निर्णय घेतला जाईल. असे आपणांस संदर्भाधिन पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे. तथापि आपल्या विभागातील सदर माहिती या सचालनालयास अद्याप प्राप्त झालेली नाही. तरी सदर माहिती दिनांक १७/१०/२०१६ पर्यंत खास दूतामार्फत सादर करण्यात यावी.

तसेच सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागातील संबधित संस्थांची गुणवत्तायादी तपासताना विशेष खबरदारी घेऊन गुणवत्तायादीची पडताळणी करण्यात यावी.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबइ

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१६/
दिनांक :- 21 OCT 2016

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुखांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेमार्फत अल्पसंख्यांक कोटयाअंर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्राची पडताळणी करून ज्यांच्या मातृभाषा शाळा सोडल्याच्या दाखल्यावर (School Leaving Certificate) वेगळी नमुद असून त्यांच्या शपथपत्रावर मातृभाषा वेगळी असल्याचे नमुद केले आहे.अशा विद्यार्थ्यांची नावे त्यांच्या आवेदन पत्रक्रमांका नुसार एकत्रीत करून त्याची यादी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास खास दुतामार्फत तात्काळ दिनांक २५/१०/२०१६ पर्यंत सादर करण्यात यावा.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.